PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्या घनतेचा भौगोलिक अभ्यास

**डॉ. तिलकचंद जि. धोटे**

भूगोल विभाग प्रमुख
डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय शेंदुरजनाघाट
जि अमरावती **(महाराष्ट्र) भारत**

---

**सारांश :-**

कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या त्या प्रदेशाच्या प्रगती आणि विकासामधील एक प्रेरक शक्ती असते. नैसर्गिक घटकांना साधनसंपत्तीचे स्वरुप लोकांमुळे प्राप्त होते. निरनिराळे व्यावसाय करणे, उत्पादन करणे, त्याच्या उपयोग करणे आणि व्यापार करणे तसेच विविध कलांचा विकास करणे हि कार्य त्या त्या प्रदेशातील लोकच करीत असतात त्यामुळे तेथील लोकसंख्या हि त्या प्रदेशाची साधनसंपदा मानवली जाते. प्रसिध्द विचारवंत फ्रेडरिक हर्बियन यांनी मानवी साधनसंपदेची व्याख्या अशी केली आहे की, अनेकविविध वस्तुंचे उत्पादन व सेवांची उपलब्धता करुन देणारी मानवाची शक्ती, कौशल्य, बुध्दी आणि ज्ञान म्हणजेच मानवी संपदा होय. आर्थिक विकासामध्ये मानव महत्वाची भूमिका बजावतो अशा या मानवी संपदेचा अभ्यास लोकसंख्या भूगोलात केला जातो. लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येचे वितरण, घनता, लोकसंख्येची रचना, लोकसंख्या वाढ, घट आणि लोकसंख्येचे स्थालांतर या अनेक घटकांचा अभ्यास केला जातो. प्रदेशाच्या विकासावर त्या प्रदेशातील लोकसंख्येचा चांगला आणि विघातक परिणा होत असतो. लोकसंख्येला त्या प्रदेशाच्या विकासाचा खरा आधार किंवा कणा मानला जातो.

लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येचे वितरण व लोकसंख्येची घनता यांचा अभ्यास मुलभूत आणि महत्वाचा मानता जातो. या घटकांवर लोकसंख्येची इतर वैशिष्ट्ये अवलंबून असते. लोकसंख्या भूगोलात कित्येकदा वितरण व घनता या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वापरतात. परंतू हे दोन्ही घटक एकमेकांशी

संबंधीत असले तरी ते भिन्न आहे. लोकसंख्या घनतेचा त्या प्रदेशातील लोकसंख्या आणि त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ यांच्याशी संबंध आहे. कोणत्याही प्रदेशाचे क्षेत्रफळ वाढत नाही पण तेथील लोकसंख्या वाढली किंवा कमी झाली तर तेथील लोकसंख्येचा घनतेत बदल होतो. प्रस्तुत शोध निबंधात नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचा घनतेचा अभ्यास करण्याच्या प्रयत्न केलेला आहे. कारण लोकसंख्या घनतेचा परिणाम मानवाच्या विकासावर होत असतो. लोकसंख्या घनता हे एखाद्या शहरातील वसाहतीतील, देशातील, राज्यातील अथवा प्रदेशातील वितरण मोजण्यासाठी वापरले जाणारे एक प्रमाण आहे. लोकसंख्या घनता म्हणजे जमिनीच्या एक चौरस कि.मी. किंवा चौरस मैल क्षेत्रफळावर राहणाऱ्या किंवा वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या होय.

बिज संज्ञा : लोकसंख्या घनता, लोकसंख्या वितरण

**प्रस्तावना :-**

नागपुर हा विदर्भातील एक प्रमुख आणि महत्वाचा जिल्हा आहे. या जिल्हातील भौगोलिक घटकांचा ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे लोसंख्याच्या घनतेत बदल होत असतो लोकसंख्येच्या घनतेवर शेत जमिनीची सुपिकता, हवामान, पाऊस, प्राकृतीक रचना, सिंचन सुविधा, कृषी औद्योगिक, नैसर्गिक वनस्पती आणि व्यापार इत्यांदी घटकांचा परिणाम होतो या सर्व घटकांवर लोकसंख्येची घनता अवलंबून असते. नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेवर या घटकांचा परिणाम दिसून येतो. नागपुर जिल्ह्यातील 50 वर्षातील लोकसंख्येच्या जणगणनेवरुन असे दिसून येते की, ग्रामीण लोकसंख्येचा प्रमाणात बदल होत असलेला दिसून येते. 2001 या जणजगना वर्षातील ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेपेक्षा 2011 या वर्षातील ग्रामीण लोकसंख्येची घनता वाढलेली दिसून येते. जमिनीचे क्षेत्र स्थिर कमी होत आहे परंतू त्याच क्षेत्रातील लोकसंख्येत वाढ होत असल्यामुळे ग्रामीण लोकसंख्येची घनता वाढत आहे. त्याच्या परिणाम तेथील लोकांच्या विकासावर होत आहे. 2001 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येची सरासरी घनता 150 इतकी होती तर 2011 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येची सरासरी घनता 157 इतकी होती. 2001 या वर्षाच्या तुलनेत 2011 मध्ये ग्रामीण लोकसंख्येची सरासरी घनता दर चौ.कि.मी. ला 7 ने वाढलेली दिसून येते.

**अभ्यास क्षेत्र :-**

भारत देशाच्या हृदय स्थानी वसलेला एक सुदंर, गौरव संपन्न व ऐतिहासीक गुण व महत्व लाभलेले शहर म्हणजे नागपुर होय. गोंड राजा बख्त बुलंद यांनी अठरांव्या शतकात हे शहर वसविले या शहराच्या नावावरुनच नागपुर जिल्हा ओळखला जातो. नागपुर जिल्हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडलेला आहे. नागपुर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 20$^{0}$ 35’ उत्तर ते 21$^{0}$ 44’ उत्तर आहे. तर रेखावृत्तीय विस्तार 78$^{0}$15’ पुर्व ते 79$^{0}$40’ पुर्व इतका आहे. या जिल्ह्यात 14 तालुके आहेत. नागपुर जिल्ह्याचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ 9892 चौ.कि.मी. असून महाराष्ट्र राज्याच्या 3.24% क्षेत्र व्यापले आहे. 2011 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील एकुण ग्रामीण लोकसंख्या 1474811 इतकी आहे. ग्रामीण लोकसंख्येची सरासरी घनता दर चौ.कि.मी. वर 157 व्यक्ती इतकी आहे.

**उदिष्टे :-**

1) नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेचा तालुका निहाय अभ्यास करणे.

2) नागपुर जिल्हयतील ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेत तालुका निहाय झालेला बदल अभ्यासणे.

3) नागपुर जिल्ह्यातील तालुका निहाय ग्रामीण लोकसंख्या घनतेचे वितरण अभ्यासणे.

**अभ्यास पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीवर आधारलेला आहे. येथे घेतलेली आकडेवारी हि महाराष्ट्र जणगणना अहवाल 2001,2011 व जिल्हा जणगणना अहवाल आणि सामाजिक आर्थिक समालोचन यावर आधारलेली आहे. यात नागपुर जिल्ह्यातील आकडेवारीचे विश्लेषण केले आहे.

**विषय समालोचन :-**

कोणत्याही प्रदेशातील एकुण लोकसंख्या आणि त्या प्रदेशाचे एकुण क्षेत्रफळ यांचे गुणोत्तर म्हणजे लोकसंख्येची घनता होय. घनता मापनाच्या अनक पध्दती आहे. गणितीय घनता, कृषि घना, ग्रामीण घनता, नागरी घनता आणि पोषण घनता या पाच प्रकारे लोकसंख्येची घनता काढली जाते. प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण दाखविण्यासाठी ग्रामीण घनतेचा उपयोग केला जातो. प्रदेशातील ग्रामीण

लोकसंख्या आणि त्या प्रदेशाचे ग्रामीण क्षेत्रफळ याचे गुणोत्तर म्हणजे ग्रामीण घनता होय. ग्रामीण घनता काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर केला जातो.

**ग्रामीण घनता =** $\frac{\text{एकुण ग्रामीण लोकसंख्या}}{\text{एकुण ग्रामीण क्षेत्रफळ}}$

**नागपुर जिल्ह्यातील तालुकानिहाय ग्रामीण लोकसंख्या घनतेचे वितरण :-**

**नगापुर जिल्ह्यातील ग्रामीण घनता (दर चौ.कि.मी. मध्ये)**

**वर्ष 2001-2011**

| अ.क्र. | तहसील | वर्ष 2001 | वर्ष 2011 | ग्रामीण घनतेतील फरक |
|---|---|---|---|---|
| 1 | नरखेड | 160 | 170 | +10 |
| 2 | काटोल | 132 | 136 | +4 |
| 3 | कळमेश्वर | 185 | 176 | -9 |
| 4 | सावनेर | 227 | 206 | -21 |
| 5 | पारशिवनी | 103 | 123 | +20 |
| 6 | रामटेक | 103 | 113 | +10 |
| 7 | मौदा | 223 | 206 | -17 |
| 8 | कामठी | 230 | 263 | +33 |
| 9 | नागपुर(ग्रामीण) | 217 | 243 | +26 |
| 10 | नागपुर (शहरी) | 00 | 00 | 00 |
| 11 | हिंगणा | 147 | 164 | +17 |
| 12 | उमरेड | 90 | 102 | +22 |
| 13 | कुही | 154 | 152 | -2 |
| 14 | भिवापुर | 136 | 121 | -15 |




2001 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनता दर चौ.कि.मी. ला 150 व्यक्ती होती. नागपुर जिल्ह्यातील काही तालुक्यात ग्रामीण घनता ही जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनतेपेक्षा जास्त आहे, तर काही तालुक्यात सरासरी ग्रामीण घनतेपेक्षा कमी आहे. नरखेड, कळमेश्वर, सावनेर, मौदा, कामठी, नागपुर(ग्रा) आणि कुही या तालुक्यात ग्रामीण घनता जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनतेपेक्षा जास्त आहे. तर काटोल, परशिवनी, रामटेक, हिंगणा, उमरेड आणि भिवापुर इत्यादी तालुक्यात ग्रामीण घनता जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनतेपेक्षा कमी असलेली दिसून येते.

2001 च्या जणगणनेनुसार सर्वात जास्त ग्रामीण घनता सावनेर तालुक्यात असून ती दर चौ.कि.मी. ला 227 व्यक्ती आहे. त्या खोलोखाल कामठी (230), मौदा (223), नागपुर ग्रामीण (217) व कळमेश्वर (185) या तालुक्यात आढळते म्हणजेच या तालुक्यात ग्रामीण क्षेत्रफळाच्या मानाने त्या तालुक्यात असलेल्या ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे तर सर्वात कमी ग्रामीण घनता उमरेड तालुक्यात असून ती दर चौ कि.मी. ला 90 व्यक्ती होती. पारशिवनी आणि रामटेक येथे ग्रामीण घनता समान असून ती दर चौरस कि.मी. ला 103 व्यक्ती आहे. या तालुक्यात ग्रामीण क्षेत्रफळाच्या मानाने ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण कमी असते.

2011 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनता दर चौ.कि.मी. ला 157 व्यक्ती आहे. नागपुर जिल्ह्यातील नरखेड, कळमेश्वर, सावनेर, मौदा, कामठी, नागपुर ग्रामीण व हिंगणा या तालुक्यात ग्रामीण घनता जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घणतेपेक्षा जास्त आढळून येते. तर काटोल, पारशिवनी, रामटेक, उमरेड, कुही व भिवापुर या तालुक्यात ग्रामीण घनता जिल्ह्यातील सरासरी ग्रामीण घनतेपेक्षा कमी आढळून येते 2011 च्या जणगणनेनुसार सर्वात जास्त ग्रामीण घनता कामठी तालुक्यात असून ती दर चौ.कि.मी. ला 263 व्यक्ती होती. त्या खालोखाल नागपुर ग्रामीण (243),सावनेर(206) व मौदा (206) या तालुक्यात आढळुन येते तर सर्वात कमी ग्रामीण घनता उमरेड तालुक्यात असून ती दर चौ.कि.मी. 102 व्यक्ती इतकी आहे. नागपुर जिल्ह्यातील सावनेर आणि मौदा तालुक्यात ग्रामीण घनता सारखी असून दर चौ.कि.मी. ला 206 व्यक्ती आहे नागपुर शहरी तालुक्यात ग्रामीण क्षेत्र नसल्यामुळे ग्रामीण लोकसंख्या नाही त्यामुळे तेथे लोकसंख्येची ग्रामीण घनता 00 (शुन्य) आहे.

जणगणना वर्ष 2001 आणि 2011 या दहा वर्षाच्या कालावधीत ग्रामीण घनतेत फार मोठा बदल झालेला आढळुन येते. या दशकात कामठी तालुक्यात सर्वात जास्त ग्रामीण घनतेत वाढ झाली असून ती 33 इतकी आहे. त्या खालोखाल नागपुर (ग्रामीण) (26), उमरेड (22), पारशिवनी (20) आणि हिंगणा (17) ने वाढ झाली आहे. तर या दशकात ग्रामीण घनतेत सर्वात जास्त घट सावनेर तालुक्यात झाली असून ती दर चौ. कि.मी. ला 21 व्यक्ती घट झाल्याचे आढळते. त्या खालोखाल मौदा (17), भिवापुर (15) व कळमेश्वर 9 ने घट झाली आहे. तसेच या दशकात सर्वात कमी ग्रामीण घनतेत वाढ काटोल तालुक्यात झाली असून ती दर चौरस कि.मी.ला 4 व्यक्ती ने वाढ झालेली दिसून येते तर ग्रामीण लोकसंख्येत सर्वात कमी घट कुही तालुक्यात असून ती दर चौ. कि.मी. 2 व्यक्ती आढळुन येते.

या दशकात नरखेड व रामटेक तालुक्यात ग्रामीण घनेतील वाढ सारखी असून दर चौ. कि.मी. ला 10 व्यक्ती इतकी आहे.

या दहा वर्षाच्या कालावधीत नागपुर कामठी, नागपुर (ग्रा.), उमरेड, पारशिवनी, हिंगणा, भिवापुर, नरखेड, रामटेक आणि काटोल या तालुक्यात ग्रामीण घनतेत वाढ झालेली आढळुन येते. तर सावनेर, मौदा, भिवापुर, कळमेश्वर आणि कुही या तालुक्यात ग्रामीण घनतेत घट झालेली आढळते.

**निष्कर्ष :-**

1) 2001 व 2011 च्या जणगणनेनुसार नागपुर जिल्ह्यातील सर्वाधिक ग्रामीण घनता कामठी तालुक्यात आढळुन येते.

2) नागपुर जिल्ह्यातील 2001 व 2011 च्या जणगणनेनुसार सर्वात कमी ग्रामीण घनात उमरेड तालुक्यात आढळुन येते.

3) 2001 ते 2011 या दशकात सर्वात कमी ग्रामीण घनता उमरेड तालुक्यात असली तरी या दशकात ग्रामीण घनतेत वाढ झालेली आढळुन येते.

4) 2001 ते 2011 या दशकात कामठी तालुक्यात ग्रामीण घनतेत सर्वात जास्त वाढ झालेली आढळुन येते.

5) 2001 ते 2011 या दशकात कुही तालुक्यात ग्रामीण घनतेत सर्वात कमी वाढ झालेली आढळून येते.

6) 2001 ते 2011 या दशकात नागपुर जिल्ह्यातील कामठी, नागपुर (ग्रा.) उमरेड व पारशिवनी या तालुक्यात ग्रामीण घनतेत जास्त वाढ झालेली आढळते.

## संदर्भ ग्रंथ :-

1) महाराष्ट्र जणगणना अहवाल 2001 व 2011

2) नागपुर जिल्हा जणगणना अहवाल 2001 व 2011

3) सामाजिक आर्थिक समालोचन 2001,2011

4) लोकसंख्या भूगोल – प्रा. विश्वास वि. यादव

5) लोकसंख्या भूगोल – डॉ. व्हि.एम.पाटील

6) लोकसंख्या शास्त्र आणि लोक शिक्षण – डॉ. एसराज कुलकर्णी श्रीवास्तव

7) लोकसंख्या भूगोल – डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शाहापूरकर डॉ. सतिश